॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव प्रतिनिधी (दि. १५) - भारताच्या ७९ व्या स्वातंत्र्य दिन व कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या ३५ व्या वर्धापन दिनानिमित्त आज शुक्रवार दि. १५ ऑगस्ट रोजी सकाळी आठ वाजता विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. व्ही एल माहेश्वरी यांच्या हस्ते ध्वजारोहणाचा समारंभ संपन्न झालानंतर हर घर तिरंगा अभियानांतर्गत विद्यापीठ परिसरात तिरंगा रॅलीसह मानवी साखळीचे आयोजन करण्यात आले. यावेळी उपस्थितांना नशामुक्तीची शपथ देण्यात आली.

यावेळी प्र-कुलगुरू एस. टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. म. सु. पगारे, प्रा. पवित्रा पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. योगेश पाटील, वित्त व लेखा अधिकारी रवींद्र पाटील, रा.से.यो. संचालक डॉ. सचिन नांद्रे यांच्यासह कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे अधिकार मंडळाचे सन्माननीय सदस्य, विद्यापीठ प्रशाळा, विभागचे संचालक, विभाग प्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच प्रशासकीय विभागाचे अधिकारी व कर्मचारी, मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. नशामुक्तीची शपथ सुभाष पवार यांनी उपस्थितांना दिली.

.............................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: १५ ऑगस्ट, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता